# कृषि हवामान सल्ला पत्रक, पालघर जिल्हा

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हाकृषि हवामान केंद्र

## गोखले एज्युकेशन सोसायटी, कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल

अंक.५७/२०२१ | दिनांक : ०९/०७ /२०२१ | कालावधी ५दिवस

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०३/०७/२०२१ ते ०९/०७/२०२१) सदर हवामान घटकांची नोंद भात संशोधन केंद्र,पालघर येथून घेण्यात आली आहे | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १०/०७/२०२१ सकाळी ८:३०पासून १४/०७/२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३/०७ | ०४/०७ | ०५/०७ | ०६/०७ | ०७/०७ | ०८/०७ | ०९/०७ | | १०/०७ | ११/०७ | १२/०७ | १३/०७ | १४/०७ |
| ०.० | ४.६ | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ५१ | ४९ | ६९ | ७९ | ९० |
| ३२.५ | ३२.५ | ३३ | ३३ | | | | कमाल तापमान (अं.से) | ३२ | ३१ | ३१ | ३१ | ३१ |
| २७.५ | २८.५ | २८ | २८.५ | | | | किमान तापमान (अं.से) | २७ | २७ | २७ | २७ | २६ |
| | | | | | | | मेघाच्छादन (ऑक्टा) | अंशत ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ७८ | ८७ | ८९ | ७७ | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ८७ | ८९ | ९० | ९३ | ९३ |
| ७२ | ८२ | ६७ | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ६२ | ६८ | ७१ | ७७ | ७६ |
| ३.६ | ६.४ | ३.९ | २.९ | | | | वाऱ्याचा वेग(किमी/तास) | ६ | ७ | ७ | ८ | ४ |
| ई. पू | वा उ | वा प | आ | | | | वाऱ्याचीदिशा | नै. द | नै. द | नै. द | नै. द | नै. द |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२१पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ४.६ | १४११.४ | ३११५.२ |

## हवामान आधारित कृषि सल्ला

| | |
|---|---|
| **हवामान पूर्वानुमान** | प्रादेशिक हवामान विभाग मुंबई, द्वारे देण्यात आलेल्या अंदाजानुसार दिनांक १० जुलै ते १४ जुलै, २०२१ दरम्यान पालघर जिल्हयात मध्यम ते जोरदार स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. आणि पुढील पाच दिवस आकाश अंशत: ढगाळ ते ढगाळ राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.<br>तसेच दिनांक १० जुलै ते १४ जुलै, २०२१ दरम्यान कमाल तापमान ३१ ते ३२ अंश सेल्सियस आणि किमान तापमान सरासरी २६ ते २७ अंश सेल्सियस राहण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित श्रेणी अंदाजानुसार दिनांक १४ ते २० जुलै, २०२१ दरम्यान उत्तर कोकणात पाऊस सरासरी पेक्षा जास्त पडण्याची शक्यता आहे तसेच कमाल व किमान तापमान हा सरासरी एवढाच राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. |
| **सामान्य सल्ला** | भात पुर्नलागवड करण्या अगोदर चिखलणीच्या वेळेस पाऊसाची तीव्रता कमी असताना एकरी ३५ कि.ग्रॅ. युरिया, १२५ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट आणि ३४ कि. ग्रॅ. म्युरेट ऑफ पोटश खते मिसळावे. एकरी २ टन गिरीपुष्पाचा पाला चिखलणीच्या वेळीस दिल्यास ५० टक्के नत्र खताची (युरिया) मात्रा कमी करून द्यावी. हळव्या भात जातींसाठी २० ते २१ दिवसांची आणि निमगरव्या व गरव्या जातींसाठी २७ ते ३० दिवसांची तसेच १२ ते १५ सें.मी. उंचीची आणि पाच ते सहा पाने फुटलेल्या रोपांची पुर्नलागवड करायला पाहिजे. |
| **संदेश** | पुढील पाच दिवस तुरळक ठिकाणी मध्यम ते जोरदार स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने भात व नागली रोपवाटीका, भाजीपाला व फळबाग लागवड क्षेत्रातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| भात | पुर्नलागवड | ✚ भात पुर्नलागवड करावयाच्या खाचरामध्ये चिखलणी करावी. चिखलणीच्या वेळेस पाऊसाची तीव्रता कमी असताना एकरी ३५ कि.ग्रॅ. युरिया, १२५ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट आणि ३४ कि.ग्रॅ. म्युरेट ऑफ पोटश खते मिसळावे. एकरी २ टन गिरीपुष्पाचा पाला चिखलणीच्या वेळीस दिल्यास ५० टक्के नत्र खताची (युरिया) मात्रा कमी करून द्यावी. हळव्या भात जातींसाठी २० ते २१ दिवसांची आणि निमगरव्या व गरव्या जातींसाठी २७ ते ३० दिवसांची तसेच १२ ते १५ सें.मी. उंचीची आणि पाच ते सहा पाने फुटलेल्या रोपांची पुर्नलागवड करावी. भात पिकाची पुर्नलागवड १५ X १५ सें.मी. (हळव्या जातींसाठी) किंवा २० X १५ सें.मी. (निमगरव्या व गरव्या जातींसाठी) अंतरावर करावी. लावणी सरळ आणि उथळ २.५ते ३.५ सें.मी. खोल करावी. उथळ लावणी केल्याने फुटवे चांगले येतात. एका चुडामध्ये २ ते ३ रोपे लावावीत आणि संकरीत भातासाठी एका ठिकाणी एकच रोप लावावे.<br>✚ चार सूत्री पध्दतीने भात पुर्नलागवड करण्यासाठी सुधारित किंवा संकरीत जातींची रोपे वापरून चुडांची नियंत्रित लावणी (१५-२५ सें.मी.) करावी. नियंत्रित लावणी नंतर त्याच दिवशी प्रत्येक चार चुडाच्या चौकोनात २.७ ग्रॅम वजनाची एक युरिया डीएपी ब्रिकेट हाताने ७.५ ते १० सें.मी. खोल खोचावी. |
| नागली | रोपवाटिका | ✚ नागली रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| आंबा | नवीन लागवड | ✚ नवीन फळबाग (आंबा, चिकू व काजू ई.) कलमांना काठीचा आधार द्यावा तसेच लागवड क्षेत्रातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| चिकू | | ✚ चिकू बागांमध्ये फळगळ झालेली फळे, फांद्या गोळा करून नष्ट करावीत तसेच पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| काळी मिरी | वाढीची अवस्था | ✚ काळी मिरीच्या वेलीना काठीचा आधार द्यावा दोरीने बांधून घ्यावे व मातीची भर द्यावी आणि शेतातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्यासाठी व्यवस्था करावी. |
| मोगरा आणि सोनचाफा | वाढीची अवस्था | ✚ मोगरा व सोनचाफा फुल पिकांमध्ये पावसाचे पाणी सचून राहिल्याने मुळकुज रोगाचा प्रादुर्भाव होवू शकतो त्याच्या नियंत्रणासाठी अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| वेलवर्गीय भाजीपाला | वाढीची अवस्था | ✚ काकडी, दोडका, कारले, दुधी भोपळा, घोसाळे यांसारख्या वेलवर्गीय रोपांना मातीची भर द्यावी व शेतातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्यासाठी व्यवस्था करावी. |
| पशु पालन | | ✚ जनावरांना सुरक्षित गोठयामध्ये बांधण्याची व्यवस्था करावी तसेच पावसाचे पाणी गोठ्यात साचणार नाही याची काळजी घ्यावी. गोठ्यातील शेण, मलमूत्राची वेळोवेळी साफसफाई करून गोठा स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवावा. पावसाळ्या दरम्यान होणाऱ्या विविध रोगांची लागण टाळण्याकरिता वेळेवर रोग प्रतिबंधक लसी टोचून घ्याव्यात. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका गोखले एज्यकेशन सोसायटीचे कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिलयेथील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली आहे.** | | |
| **ई-मेल:kvkkosbad439@gmail.com** | | **संपर्क:८५५२८८२७१२** |

**स्त्रोत**

१) **हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई**

२) **मागील हवामान : कृषि संशोधन केंद्र, पालघर**

**ठिकाण: कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिलपालघर**

**दिनांक: ०९/०७/२०२१**

**स्वाक्षरित**

**प्रमुख अन्वेषक,**

**ग्रामीण कृषि मौसम सेवा - जिल्हा कृषि हवामान केंद्र**

**कृषि विज्ञान केंद्र कोसबाड हिल,पालघर**